# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४८/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १३/०१/२०२६

प्रति,
जिल्हाधिकारी,
रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर,
छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशीव, लातूर

विषय :- राज्यातील १२ जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका -

संदर्भ :-१) मा. सर्वोच्च न्यायालयाने दाखल पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र. १९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५, दि.१६/०९/२०२५ व दि.२८/११/२०२५ रोजी दिलेले आदेश

२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.२०/का.७, दि.२३/०९/२०२५, दि.२७/१०/२०२५ तसेच दि.११/११/२०२५ व दि.२४/११/२०२५ रोजीचे पत्र

३) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.३०/का.७, दि.०१/१०/२०२५, रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आली आहे.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व त्यासोबत संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५, दि.१६/०९/२०२५ व दि. २८/११/२०२५रोजी दिलेल्या निर्देशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करणे बंधनकारक आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २८/११/२०२५ रोजी दिलेल्या आदेशात ३२ जिल्हा परिषदा आणि

३३६ पंचायत समित्यांच्या बाबतीत नमूद केले आहे की, ज्या जिल्हा परिषद / पंचायत समित्यांचे आरक्षण ५० टक्केपेक्षा जास्त नसेल तेथे यापुर्वी दिलेल्या आदेशानुसार निवडणुका घ्याव्यात. त्यानुसार व आरक्षण मर्यादेत असलेल्या, १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांमधील (परिशिष्ट-२) सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

३. त्यानुसार संबंधित १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी संदर्भाकित अ.क्र.२ समोरील नमूद पत्रान्वये देण्यात आलेल्या मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमानुसार संबंधित जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत पंचायत समित्यांची दि.०३/११/२०२५ रोजी अंतिम मतदार यादी व दि.२७/११/२०२५ रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. आता, राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम याद्वारे जाहीर करण्यात येत आहे.-

४. **निवडणूक कार्यक्रम** - महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम ९अ(४) मधील अधिकारांचा वापर करुन राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जोडलेल्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद वेळापत्रकानुसार जाहीर करण्यात येत आहेत.

५. **निवडणुका न्यायालय निर्णयाच्या अधीन** - या पत्रासोबतच्या परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेल्या १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुका ह्या मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५, दि.१६/०९/२०२५ व दि.२८/११/२०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार या याचिकेतील अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

६. **आचारसंहिता** - निवडणुकीची आचारसंहिता निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. सदर आचारसंहिता ही निवडणूक होणाऱ्या जिल्हा परिषद/पंचायत समिती क्षेत्रात लागू राहील. मात्र सार्वत्रिक निवडणूक असलेल्या जिल्हा परिषद / पंचायत समित्यांमधील मतदारांवर प्रभाव पडेल, अशा तऱ्हेचे कोणतेही धोरणात्मक निर्णय, कोणतीही

कृती/घोषणा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था, मंत्री, खासदार, आमदार, किंवा इतर कोणत्याही पदाधिकाऱ्यांना करता येणार नाही. याप्रकरणी राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का-७, दि.०४ नोव्हेंबर २०२५ रोजीचे आदेश विचारात घ्यावेत.

७. **जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुभा** - महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १२अ मधील तरतुदीनुसार जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छूक व्यक्तींनी नामनिर्देशन पत्रासोबत जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तथापि, जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी जात पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा जात पडताळणी समितीकडे असा अर्ज केला असल्याचा अन्य कोणताही पुरावा नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. यासंदर्भात राज्य शासनाच्या सन २०२५ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, दि.२६ डिसेंबर २०२५ अन्वये उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. याबाबत उमेदवाराकडून नामनिर्देशन पत्रासोबत विहित केलेले हमीपत्र घेण्यात यावे.

८. **पारंपारिक पध्दतीने (Offline) नामनिर्देशनपत्र** - सदर निवडणुकीसाठी नामनिर्देशन पत्र स्विकारण्याची प्रक्रिया पारंपरिक पध्दतीने राबविण्यात येणार असून छापील नामनिर्देशनपत्रामध्ये तसेच शपथपत्रामध्ये माहिती भरावी. दृढकथन करुन व स्वाक्षरी करुन आवश्यकतेनुसार सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने सादर करावे. जिल्हाधिकारी कार्यालयाने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशनपत्र व शपथपत्र इ.नमुने उमेदवारांकरिता उपलब्ध ठेवावेत.

९. **न्यायालयीन प्रकरण** - सार्वत्रिक निवडणूक असलेल्या १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसदर्भात न्यायालयात याचिका दाखल झाल्या असल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच कोणत्याही रिट याचिकेमध्ये मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम तात्काळ रद्द/ स्थगित करुन तसे आयोगास अवगत करावे.

१०.  **पूर्वतयारीचे आदेश** - राज्य निवडणूक आयोगाचे क्र. रानिआ/जिपपंस-२०२६/प्र.क्र.०६/ का.७, दि. ११/०१/२०२६ रोजी निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर आदेश निर्गमित केलेले आहेत, त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

११.  सदरचा निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. राज्य निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ व ईमेल आयडी पुढीलप्रमाणे आहे :-

संकेत स्थळ : https://mahasec.maharashtra.gov.in
ई-मेल : sec.zpps@mah.gov.in

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

१३.०१.२०२६

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत:- परिशिष्ट १ व २

प्रत :-

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई -४०० ००१
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, छत्रपती संभाजीनगर
८) सर्व संबंधित जिल्हा पोलिस अधीक्षक
९) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई-४००००४
१०) मा. सर्वोच्च न्यायालय व मा. मुंबई उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे पॅनलवरील सर्व वकील
११) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१२) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
१३) निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र. ४८/का.७, दि. १३/०१/२०२६ सोबतचे सहपत्र)

परिशिष्ट-१

राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम-२०२६

| अ.क्र. | कार्यक्रमाचा तपशिल | कार्यक्रमाचा दिनांक |
|---|---|---|
| | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | दि.०१ जुलै २०२५ (मंगळवार) |
| १ | जिल्हाधिकारी यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना प्रसिध्द करण्याची तारीख | दि.१६ जानेवारी २०२६ (शुक्रवार) |
| २ | नामनिर्देशन पत्र देण्याचा कालावधी | दि.१६ जानेवारी २०२६ (शुक्रवार) ते<br>दि.२० जानेवारी २०२६ (मंगळवार)<br>( सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत )<br>दि.२१ जानेवारी २०२६ (बुधवार)<br>( सकाळी ११ ते दुपारी २ पर्यंत )<br>(रविवार दि.१८/०१/२०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्र देण्यात येणार नाही.) |
| ३ | नामनिर्देशन पत्र स्विकारण्याचा कालावधी | दि.१६ जानेवारी २०२६ (शुक्रवार) ते<br>दि.२१ जानेवारी २०२६ (बुधवार)<br>( सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत )<br>(रविवार दि.१८/०१/२०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्र स्विकारण्यात येणार नाही.) |
| ४ | नामनिर्देशनपत्राची छाननी व त्यावर निर्णय देणे | दि.२२ जानेवारी २०२६ (गुरुवार)<br>( सकाळी ११ वाजल्यापासून ) |
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.२२ जानेवारी २०२६ (गुरुवार)<br>**छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच** |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा दिनांक | दि.२३ जानेवारी २०२६ (शुक्रवार),<br>दि.२४ जानेवारी २०२६ (शनिवार) व<br>दि. २७ जानेवारी २०२६ (मंगळवार)<br>( सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत )<br>(रविवार दि.२५/०१/२०२६ व सोमवार दि.२६/०१/२०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने उमेदवारी मागे घेण्याची नोटीस स्विकारण्यात येणार नाही.) |
| ७ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे व निशाणी वाटप | दि.२७ जानेवारी २०२६ (मंगळवार)<br>( दुपारी ३.३० नंतर ) |
| ८ | मतदानाची तारीख | दि.०५ फेब्रुवारी २०२६ (गुरुवार)<br>( सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत ) |
| ९ | मतमोजणी तारीख | दि.०७ फेब्रुवारी २०२६ (शनिवार)<br>( सकाळी १०.०० पासून ) |
| १० | निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात प्रसिध्द करणे | दि.१० फेब्रुवारी २०२६ (मंगळवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

१३.०१.२०२६

( सुरेश काकांणी )

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र. ४८/का.७, दि. १३/०१/२०२६ सोबतचे सहपत्र)

## परिशिष्ट-२

| अ.क्र. | जिल्हा परिषद | पंचायत समित्या |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | रायगड | पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, उरण, अलिबाग, मुरुड, रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर |
| २ | रत्नागिरी | मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, गुहागर, रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा, राजापूर |
| ३ | सिंधुदुर्ग | वैभववाडी, कणकवली, देवगड, मालवण, कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी दोडामार्ग |
| ४ | पुणे | जुन्नर, आंबेगाव, शिरुर, खेड, मावळ, मुळशी, हवेली, दौंड, पुरंदर, वेल्हे, भोर, बारामती, इंदापूर |
| ५ | सातारा | खंडाळा, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, वाई, महाबळेश्वर, जावळी, सातारा, पाटण, कराड |
| ६ | सांगली | आटपाडी, जत, खानापूर (विटा), कडेगाव, तासगाव, कवठे महांकाळ, पलुस, वाळवा-ईश्वरपूर, शिराळा, मिरज |
| ७ | सोलापूर | करमाळा, माढा, बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर,माळशिरस, मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट |
| ८ | कोल्हापूर | शाहुवाडी, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, कागल, करवीर, गगनबावडा, राधानगरी, भुदरगड, आजरा, गडहिंग्लज, चंदगड |
| ९ | छत्रपती संभाजीनगर | सोयगाव, सिल्लोड, कन्नड, फुलंब्री, खुलताबाद, वैजापूर, गंगापूर, छत्रपती संभाजीनगर, पैठण |
| १० | परभणी | जिंतूर, परभणी, मानवत, सेलू, पाथरी, सोनपेठ, पूर्णा, पालम, गंगाखेड |
| ११ | धाराशीव | परांडा, भूम, वाशी, कळंब, धाराशीव, तुळजापूर, लोहारा,उमरगा |
| १२ | लातूर | अहमदपूर, जळकोट, उदगीर, चाकूर, रेणापूर, लातूर, शिरूर (अनंतपाळ), देवणी, औसा, निलंगा |